महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ✆२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ✆२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र.३७४(२)/स्थापत्य/२०१९/१९** **दिनांक- १६ मार्च, २०२२**

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ करीता पसंतीक्रम व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या सुविधेबाबत.**

**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १७/२०१९.**

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०१९ करीता सर्वसाधारण गुणवत्ता यादी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्र / कागदपत्र यांची पुनर्पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊन प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येईल, असे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकात नमूद केले आहे.

३. विषयांकित परीक्षेच्या उमेदवारांकडून आयोगाच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये संवर्ग / पदांचे पसंतीक्रम मागविण्यात आले होते. अंतिम निकालासंबंधीच्या कार्यवाहीकरीता आयोगाकडून सुधारित कार्यपध्दतीचा स्वीकार केलेला असल्याने सर्व उमेदवारांनी संवर्ग / पदांचे पसंतीक्रम पुन्हा नव्याने सादर करणे अनिवार्य होते. तथापि, सदर परीक्षेकरीता एकूण ३७४ उमेदवारांनी आयोगाच्या http://mpsc.gov.in संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES या मेनूमध्ये Post Preference / Opting Out या वेबलिंकवर पदांचे पसंतीक्रम सादर केले नाहीत किंवा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) पर्यायही निवडलेला नाही. सदर ३७४ उमेदवारांना उपरोक्त वेबलिंकवर पसंतीक्रम वा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) चा पर्याय सादर करण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे.

४. संवर्ग / पदांचे पसंतीक्रम सादर करण्याकरीता आयोगाच्या http://mpsc.gov.in संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES या मेनूमध्ये Post Preference / Opting Out वेबलिंक पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी १८.०० वाजेपासून दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

५. पसंतीक्रम अथवा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प यांच्या आधारे अंतिम निकाल/शिफारशी संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-

(१) पसंतीक्रम सादर करणारे उमेदवार ज्या सवंर्ग / पदांचे पसंतीक्रम सादर करतील, केवळ त्याच संवर्ग / पदांवरील निवडीकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

(२) विहित कालावधीनंतर संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची अथवा बदलण्याची उमेदवारांची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

(३) भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम शिफारशीकरीता विचार करण्यात येणार नाही.

६. संवर्ग / पदांचे पसंतीक्रम सादर करण्यात कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

**ठिकाण- मुंबई.**

**उपसचिव, परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**